## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३१ (प्रतिनिधी) : खान्देशात जैवशास्त्र विषयातील पहिली पिढी घडविण्याचे काम शिक्षक या नात्याने प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी केले असून आज एकीकडे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील संवाद संपत असतांना प्रा. माहेश्वरी यांच्यासारखा शिक्षक होणे नाही अशी भावना प्रा. माहेश्वरी यांच्या गौरव समारंभात व्यक्त झाली.

कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी हे ३१ वर्षांच्या सेवेनंतर आज दि. ३१ जुलै रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जैवशास्त्र प्रशाळेतील प्रोफेसर पदावरून सेवानिवृत्त झाले. जैवशास्त्र प्रशाळेच्या वतीने दोन दिवसांपासून सुरु असलेल्या राष्ट्रीय परिसंवादाच्या समारोप सत्रात प्रा. माहेश्वरी यांच्या सेवेचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून भारताच्या कृषी शास्त्रज्ञ निवड मंडळाचे माजी अध्यक्ष तथा परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.सी.डी. मायी उपस्थित होते. यावेळी मंचावर प्रशाळेचे संचालक प्रा.ए.जी. इंगळे, संयोजन सचिव प्रा.भूषण चौधरी व प्रा. के.एस. विश्वकर्मा, शैलैजा माहेश्वरी उपस्थित होते.

यावेळी आघरकर संशोधन केंद्र पुणे येथील डॉ. प्रशांत ढाकेफळकर, डॉ. तुषार बोरसे, नॅशनल केमिकल लॅब पुणे येथे डॉ. अशोक गिरी, जळगाव येथील नवीन दंदी, उद्योजक डॉ. निलेश तेली , पुणे येथील डॉ. हेमलता मेंडकी या आजीमाजी विद्यार्थ्यांनी प्रा. माहेश्वरी यांच्याबद्दल हृदय भावना व्यक्त केल्या. प्रा. माहेश्वरी यांनी कायम विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षक या नात्याने विद्यार्थ्यांच्या सुख दु:खात ते सहभागी झालेत. उद्योजकतेचे मार्ग त्यांनी दाखविले. संशोधनात विद्यार्थ्यांना गोडी निर्माण होईल यासाठी प्रयत्न केले. विशेष म्हणजे समर्पणाच्या भावनेतून ते शिक्षक म्हणून कायम कार्यरत राहिले अशा भावना यावेळी त्यांनी व्यक्त केल्या.

डॉ. सी.डी. मायी यांनी शिक्षक हा निवृत्त होत नसतो. कुलगुरू या नात्याने प्रा. माहेश्वरी हे यापुढेही विद्यार्थ्यांना मार्ग दाखवतील असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. एस.टी. इंगळे यांनी प्रा. माहेश्वरी हे उत्तम शिक्षक आहेत. त्यांनी संशोधक विद्यार्थी घडवले आणि विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आकार दिला. चर्चा आणि संवादातून ते सतत मार्ग काढत असतात असे प्रा.इंगळे म्हणाले. सत्काराला उत्तर देतांना प्रा. माहेश्वरी यांनी आपल्या ३१ वर्षातील शिक्षक म्हणून आलेले अनुभव आणि जीवन प्रवास सांगितला. शिक्षकीपेशाचा आपण आनंद घेतला. विद्यार्थ्यांमध्ये रमायला आपल्याला आवडते. संशोधन हा आपला आत्मा आहे असे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी भूषण चौधरी यांनी या परिसंवादाचा अहवाल सादर केला. प्रा. प्रवीण पुराणीक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रा. के.एस. विश्वकर्मा यांनी आभार मानले.

या परिसंवादाच्या सकाळच्या सत्रात छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. सतीष कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथील डॉ. मुनीष कुमार, इंदौर येथील प्रा. मिता जैन यांचे व्याख्यान झाले. त्यानंतर तुमसर येथील डॉ. के.एन. साठवणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्रात डॉ. प्रशांत ढाकेफळकर, इंदौर येथील डॉ.सुनीता कटारीया यांचे व्याख्यान झाले.

### बातमी नं. २

जळगाव दि.३१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातंर्गत संलग्ननित महाविद्यालय / परिसंस्था आणि शैक्षणिक प्रशाळा यामधील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेकरीता १० ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.

विद्यापीठात बऱ्याच विद्यार्थी/विद्यार्थिंनी यांचेकडून महाविद्यालयात प्रवेश मिळणेबाबत विनंती अर्ज प्राप्त झाले होते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन विद्यापीठाने संलग्ननित महाविद्यालय / परिसंस्था आणि शैक्षणिक प्रशाळा यामध्ये विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता १० ऑगस्ट पर्यंत विशेष बाब म्हणून मुदत वाढवून दिली आहे.

प्रवेशापासून वंचीत असलेल्या विद्यार्थी/ विद्यार्थिनींनी महाविद्यालयामध्ये जाऊन प्रवेश घ्यावेत असे आवाहन विद्यापीठाने परिपत्रकान्वये केले आहे.

**बातमी नं. ३**

जळगाव दि.३१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे तसेच महाराष्ट्र सायबर सेल यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील केंद्रीय विद्यालय येथे 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' याबाबत जनजागृती करण्यात आली.

विद्यापीठातील केंद्रीय विद्यालयात क्विक हिल फाऊंडेशन, पुणे व महाराष्ट्र सायबर सेल यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थिनी प्रगती कोल्हे व सायली चौधरी यांची 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या योजनेत निवड झाली आहे. या विद्यार्थिनींनी सायबर सुरक्षेबाबत धडे दिले तसेच क्वीक हिल व महाराष्ट्र सायबर सेलचे कामाची माहिती दिली. त्यांनतर इंटरनेट मार्फत लहान मुलांसोबत जे गुन्हे होतात त्यापासून कसा बचाव करता येतो याबाबतीत सविस्तर माहिती दिली. यावेळी केंद्रीय विद्यालयाचे संगणक कक्षाचे शिक्षक नितीन पाटील, तसेच प्राचार्य सोना कुमार हे उपस्थित होते. क्वीक हिल फाउंडेशचे सुंगधा दाणी व थकन जानगवळी व संगणकशास्त्र प्रशाळेचे समन्वयक प्रा. राजु आमले यांचे मार्गदर्शन लाभले.

..........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ३१ जुलै, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी